# जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव

(पुरवठा शाखा)

दुरध्वनी व फॅक्स क्रमांक (०२५७-२२२९७०८) ई मेल- dsojalgaon1@gmail.com

क्र.पुरवठा/जि.पु.ज.-1/ई-टपाल/2020/ दिनांक :- 30 / 04 / 2020

**प्रेस नोट --**

**विषय :** माहे मे व जून 2020 या दोन महिन्याच्या कालावधीकरिता सवलतीच्या दराने रास्त भाव दुकानातून अन्नधान्य उपलब्ध करून देणेबाबत.

शासनाकडून राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत अंत्योदय , प्राधान्य कुटुंब योजना लाभार्थ्यांना दरमहा अन्नधान्य उपलब्ध करून देणेत येते. मात्र ज्या लाभार्थ्यांकडे एपीएल केशरी शिधापत्रिका आहे परंतु त्यांचा समावेश राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत झालेला नाही अशा कार्डधारकांना सवलतीच्या दराने अन्नधान्याचा लाभ होत नव्हता. तथापी शासनाने Novel Corona Virus प्रादुर्भावाच्या पार्श्वभुमीवर एपीएल केशरी शिधापत्रिकाधारकांना माहे मे 2020 व जून 2020 करिता सवलतीच्या दराने मासिक नियतन मंजूर करण्यात आलेले आहे. गहू रू. 8/- प्रति किलो आणि तांदूळ रू. 12/- प्रति किलो या दराने प्रति लाभार्थी 3 किलो गहू आणि 2 किलो तांदूळ रास्त भाव दुकानातून वितरीत करणेत येणार आहे.

1. मा.डॉ. अविनाश ढाकणे, जिल्हाधिकारी जळगाव यांचे निर्देशानुसार जळगाव जिल्ह्यासाठी एपीएल (केशरी) यांना देय असलेले धान्य, अंत्योदय आणि प्राधान्य कुटुंब योजना लाभार्थ्यांना देय असलेले नियमित धान्य व मोफतचे धान्य याबाबत वेळापत्रक ठरवून देणेत आले आहे.
2. दि. 1 मे ते 10 मे 2020 या कालावधीत एपीएल ( केशरी ) शिधापत्रिकाधारकांसाठी धान्य वाटप होईल.
3. दि. 11 मे ते 20 मे या कालावधीत अंत्योदय आणि प्राधान्य कुटुंब योजना लाभार्थ्यांना नियमित धान्य देणेत येईल .
4. दि. 21 मे 31 मे या कालावधीत अंत्योदय आणि प्राधान्य कुटुंब योजना लाभार्थ्यांना मोफत तांदूळ वाटप करणेत येईल.
5. तसेच दि. 21 मे ते 31 मे या कालावधीत राहिलेले एपीएल ( केशरी ) शिधापत्रिकाधारक, राहिलेले अंत्योदय आणि प्राधान्य कुटुंब योजना लाभार्थी यांना त्यांचे नियमित देय आणि मोफतचे धान्य देणेत येईल
6. दि. 1 मे 2020 ते दि. 10 मे 2020 या कालावधीत एपीएल (केशरी) शिधापत्रिका ज्या रास्त भाव दुकानास जोडली आहे त्या रास्त भाव दुकानातून सदर अन्नधान्य वितरण होईल. या कालावधीत अन्नधान्य न घेतल्यास दि. 21 मे ते 31 मे या कालावधीत प्राप्त करावे.
7. एपीएल केशरी शिधापत्रिकाधारका पात्र लाभार्थ्यांची यादी असलेले D-1 रजिष्टरनुसार शिधापत्रिकेत नमुद सदस्यांकरीता सवलतीच्या दराने अन्न धान्य देय राहील.D-1 रजिष्टरला नोंद नसल्यास धान्य मिळणार नाही. अशा कार्डधारकांनी जुने कार्ड तहसिल कार्यालयात जमा करावे. अशा कार्डांची चौकशी करणेत येऊन कडक कारवाई करणेत येईल. या लाभार्थ्यांनी नवीन पुरावे देऊन रितसर नवीन कार्ड काढून घ्यावे.
8. ज्या एपीएल शिधापत्रिकाधारकांच्या नोंदी संगणकीय प्रणालीवर झाल्या नसतील अथवा या शिधापत्रिकांचे आधार सिडींग झाले नसेल तरी या शिधापत्रिकाधारकांना त्यांचे शिधापत्रिका तपासून विहीत दराने अन्नधान्य देण्यात येईल. मात्र यासाठी मुळ शिधापत्रिका सादर करणे आवश्यक आहे.मुळ शिधापत्रिका सादर न केल्यास धान्याचा लाभ मिळणार नाही.
9. अन्नधान्य वाटप करतांना दुकानदाराकडून त्या शिधापत्रिकेचा क्रमांक, त्यातील पात्र सदस्यांची संख्या ,शिधापत्रिकेवरील संपुर्ण तपशिल याची नोंद घेतली जाईल. नोंदवहीमध्ये धान्य घ्यावयास आलेल्या सदस्याची स्वाक्षरी अथवा डाव्या हाताचा अंगठ्याचा ठसा न घेता शिधापत्रिकेमधील कुटूंबप्रमुखाचा अथवा अन्य सदस्याचा आधार क्रमांक (उपलब्ध असल्यास) नमुद करावा

Scanned by CamScanner

10. सर्व रास्तभाव दुकानदारांकडून या योजने अंतर्गत जेवढ्या लाभार्थ्यांना सवलतीचा लाभ दिला याबाबतचा तपशिल दररोज संकलित करणेत येईल.

11. एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारकांना धान्य दिल्यानंतर त्यांचे शिधापत्रिकेवर धान्य दिल्याची पोहच म्हणून शिधापत्रिकेच्या शेवटच्या पानावर शिक्का मारणेत येईल.

| |
|---|
| नोव्हेल कोरोना- APL |
| रा.भा.दु.ना.- |
| धान्य दिल्याचा महिना- मे 2020 / जून2020 |
| गहू- किलो + तांदूळ- किलो |

12. एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारकांना धान्य दिल्याबाबत पुढील नमुन्यात स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात येईल.

13. तालुक्यात योग्य रितीने एपीएल ( केशरी ) साठी अन्नधान्याचे वाटप करण्याची जबाबदारी रास्तभाव दुकानदार तसेच पुरवठा ग्राम दक्षता समिती यांची राहिल.

14. जिल्हा प्रशानाकडून शिक्षकांच्या सेवा या कामी घेणेत आल्या असुन शिक्षकांकडे 50 ते 60 कुटुंबांच्या पालकत्वाची जबाबदारी देणेत आली आहे.

15. नियुक्त पालक शिक्षक लाभार्थी प्रकार , धान्याचा प्रकार , देय असलेले धान्य, त्याचा दर, प्रत्येक लाभार्थ्यास तो समाविष्ट असलेल्या योजनेनुसार किती धान्य देय आहे , स्वस्त धान्य दुकान कोठे आहे, दुकानाची वेळ इ. बाबत त्यांना पालकत्व देणेत आलेल्या कुटुंबामध्ये जनजागृती करतील.

16. पालक शिक्षक त्यांना नेमुन दिलेल्या लाभार्थ्यांना त्यांना देय असलेले धान्य सुरळीत मिळाले किंवा कसे याबाबतचा अहवाल संबंधीत तलाठी यांना सादर करतील.

17. ग्रामस्तरीय दक्षता समिती, सदस्य व पालक शिक्षक लाभार्थ्यांना सोशल डिस्टन्सिंगचे महत्व समजावून सांगतील. पात्र लाभार्थी, कार्डधारक अन्नधान्यापासून वंचित राहणार नाही याची खात्री करणेत येईल.

18. याच पध्दतीने नियोजन माहे जुन 2020 मध्ये देखील करणेत आलेले असून माहे जुन मध्ये देखिल ग्रामस्तरीय दक्षता समिती व पालक शिक्षक पर्यवेक्षण करतील व अहवाल सादर करतील.

19. तहसिल स्तरावर नायब तहसिलदार / अ.का. / मंडळ अधिकारी / पुरवठा निरीक्षण अधिकारी / पुरवठा निरिक्षक त्यांना नेमून देणेत आलेल्या रास्त भाव दुकानांची तपासणी करतील.

(सुनिल सुर्यवंशी) 30.4.20
जिल्हा पुरवठा अधिकारी जळगांव

Scanned by CamScanner